**<u>ठळक बातम्या</u>**

- टीईटीचा पेपर भिवंडीत फुटल्यानं उद्या होणारी परीक्षा रद्द, परराज्यातल्या तिघांना अटक

- टीईटी पेपरफुटी प्रकरणी मकोका लावण्याचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा प्रयत्न, निष्पक्ष चौकशीची विरोधकांची मागणी

- सेशेल्स दौऱ्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी स्वातंत्र्य दिनाच्या सोहळ्यात सहभागी होणार

**आणि**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या मन की बात द्वारे देशवासियांशी संवाद साधणार

**<><><><><>**

टीईटी अर्थात शिक्षक पात्रता परीक्षेचा पेपर फुटल्यानं उद्या होणारी परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. परीक्षेची आगामी तारीख लवकरच वेबसाइटवर जाहीर केली जाईल असं महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेनं जाहीर केलं आहे. याप्रकरणी मकोका लावण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे करणार असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं आहे. तर या प्रकरणाची तत्काळ, निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा काँग्रेसनं दिला आहे. याविषयी सविस्तर जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून…

***<u>होल्ड</u>-कॅप्सूल***

*(ठाणे जिल्ह्यात भिवंडीमधल्या काही व्यक्तींकडे टीईटीच्या प्रश्नपत्रिकेतले काही प्रश्न असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी आज पहाटे धाड टाकून चौकशी केली. या व्यक्तींकडे असलेल्या कागदपत्रांमध्ये आणि उद्या होणाऱ्या परीक्षेतले प्रश्न समान असल्याचं आढळून आलं. राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी याला दुजोरा दिल्यावर भिवंडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तिघांना अटक करण्यात आली आहे. राजीव शॉ, आकाश कुमार आणि धीरज सिंह अशी आरोपींची नावं आहेत. यातले राजीव आणि आकाश हे बिहारचे तर धीरज सिंह हा हरियाणाचा रहिवासी आहे. त्यांच्या ताब्यातून मोबाईल, रोख रक्कम आणि TET परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे चार संच जप्त करण्यात आले आहेत. आरोपी भिवंडीत कोणाच्या संपर्कात होते, या प्रकरणात कोणत्या शैक्षणिक संस्था किंवा स्थानिक एजंटचा सहभाग आहे का, तसेच या संपूर्ण नेटवर्कचा सूत्रधार कोण आहे, याचा तपास पोलीस करत आहेत, अशी माहिती अतिरिक्त पोलीस आयुक्त अशोक दुधे यांनी बातमीदारांना दिली.*

**- अशोक दुधे**

*या प्रकरणाच्या तपासासाठी पोलीस उपायुक्त पवन बनसोड यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे, या पथकात दोन सहाय्यक पोलीस आयुक्त, ९ पोलीस निरीक्षक आणि इतर वीस कर्मचाऱ्यांचा समावेश आहे, असं दुधे यांनी सांगितलं. ही पथकं विविध ठिकाणी रवाना झाले आहेत, तपासात जे निष्पन्न होईल त्यानुसार दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असं ते म्हणाले.*

*टीईटी परीक्षेच्या पेपरफुटीची घटना अत्यंत संतापजनक असून, या प्रकरणातील मुख्य सूत्रधार आणि आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यासाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी सविस्तर चर्चा करणार असल्याचंही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.*

***आरोपींकडून** जप्त केलेल्या प्रश्नपत्रिकेतले प्रश्न टीईटी प्रश्नपत्रिकेतल्या काही प्रश्नांशी जुळत होते, अशी माहिती शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी बातमीदारांशी बोलताना दिली. या प्रकरणाची सरकारने गंभीर दखल घेतली असून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.*

***होल्ड बाईट भुसे***

*नीट परीक्षेचा पेपर फुटल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य परिषदेने खबरदारी घेतली होती, पेपर कसा फुटला हे चौकशीनंतर स्पष्ट होईल ,असं भुसे यांनी सांगितलं.*

***सातत्याने** विविध परीक्षांचे पेपर फुटणं हे सरकारचं अपयश असल्याची टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. याला जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई होईलही, पण असे प्रकार वारंवार होणं कधी  बंद होणार आहे, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. सरकारला विद्यार्थ्यांच्या भवितव्याविषयी देणंघेणं नाही अशी टीकाही त्यांनी केली.*

***होल्ड बाईट वडेट्टीवार***

*या परीक्षेसाठी यंदा ४ लाख २८ हजार १२२ परीक्षार्थी बसले होते. परीक्षेची आगामी तारीख लवकरच वेबसाइटवर जाहीर केली जाईल असं महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेनं जाहीर केलं आहे.)*

**<><><><><>**

‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने अंतर्गत, जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून कर्जमुक्तीची रक्कम पात्र शेतकऱ्यांच्या थेट कर्जखात्यांमध्ये जमा होण्यास सुरुवात होईल, असं प्रशासनानं जाहीर केलं आहे. कर्जखात्याच्या माहितीत किंवा बँक तपशीलात काही तांत्रिक त्रुटी असल्यास शेतकऱ्यांना दाद मागता यावी, म्हणून सक्षम तक्रार निवारण व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ३ दिवसीय दौऱ्यासाठी सेशल्सची राजधानी व्हिक्टोरिया इथं दाखल झाले. सेशल्सचे अध्यक्ष पॅट्रिक हर्मीनी यांनी विमातळावर केलेल्या स्वागताबद्दल प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात त्यांचे आभार मानले. सेशल्स हा भारताचा महत्वपूर्ण सागरी भागीदार आणि हिंद महासागर क्षेत्रातला घनिष्ठ मित्र आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. आपल्या भेटीमुळे नागरिकांच्या कल्याणासाठी दोन्ही देशातलं सहकार्य वाढेल, अशी आशा  त्यांनी व्यक्त केली. सेशल्सच्या ५०व्या स्वातंत्र्य दिनाच्या मुख्य सोहळ्यात प्रधानमंत्री मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. हा बहुमान मिळालेले ते पहिले भारतीय नेते आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरुन मन की बात च्या १३५व्या भागातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. आकाशवाणी, दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, यूट्यूब वाहिन्या, तसंच न्यूज ऑन AIR ॲपवरून ‘मन की बात’ ऐकता येणार आहे.

**<><><><>**

राम मंदिर देणग्यांचा कथित अपहार केल्याप्रकरणी  श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र विश्वस्त मंडळाचे महासचिव चंपत राय आणि सदस्य अनिल मिश्रा यांनी राजीनामे दिले असल्याची माहिती विश्वस्त मंडळानं दिली आहे. या राजीनाम्यांवर ११ जुलै रोजी होणाऱ्या बैठकीत निर्णय घेतला जाणार असल्याचंही विश्वस्त मंडळानं कळवलं आहे.  देणग्यांशी संबंधित आरोपांची निष्पक्ष चौकशी केली जाईल असं आश्वासनही विश्वस्त मंडळानं दिलं आहे.

अयोध्येतल्या राममंदिराच्या देणग्यांमधील कथित गैरव्यवहारावरून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी टीका केली. रामाला भाजपापासून मुक्त करण्याच्या चळवळीचं नेतृत्व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष करेल असंही ते यावेळी म्हणाले.

**<><><><>**

मध्य प्रदेशातल्या  छिंदवाडा जिल्ह्यात दोन वेगवेगळ्या ठिकाणी वीज पडून झालेल्या अपघातात चौघांचा मृत्यू झाला तर आठ जण जखमी झाले आहेत. या घटनेतल्या दोन गंभीर जखमींना जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आलं आहे, तर चौघांवर बैहर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. बैहर आणि गढी पोलीस ठाण्याच्या हद्दीत या घटना घडल्याची माहिती स्थानिक पोलिसांनी दिली.

**<><><><>**

अफगाणिस्तानच्या ईशान्य भागाला आज ६ पूर्णांक १ दशांश रिख्टर स्केलच्या भूकंपाचा धक्का बसला. प्राथमिक माहितीनुसार यात जीवितहानीचं वृत्त नाही. या भूकंपाचं केंद्र २१५ किलोमीटर भूगर्भात असल्याचं राष्ट्रीय भूकंपशास्त्र

संस्थेनं म्हटलं आहे. दिल्ली आणि जम्मू-काश्मिरमधल्या काही भागातही या भूकंपाचे धक्के जाणवले आहेत.

**<><><><><>**

इराणने आपल्यावर पुन्हा ड्रोन हल्ला केल्याचा बहारीननं केला आहे. बहारीनच्या परराष्ट्र मंत्रालयानं निवेदन जारी करून हा आरोप केला, मात्र त्यांनी हल्ला झालेल्या ठिकाणांबाबतचे कोणतेही तपशील दिलेले नाहीत. मात्र या हल्ल्यात कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचंही बहरीननं म्हटलं आहे.

दरम्यान, अमेरिकेने इराणच्या दक्षिण किनारपट्टीवर केलेल्या हवाई हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून आपण बहारीनमधल्या अमेरिकेच्या लष्कराशी संबंधित ठिकाणांना लक्ष्य करून आपण हा हल्ला केल्याचं इराणच्या लष्करानं म्हटलं आहे. अमेरिकेचा हल्ला हा संयुक्त राष्ट्रांची सनद आणि दोन्ही देशांमधील युद्ध संपुष्टात आणण्याच्या कराराचं उल्लंघन आहे असा दावाही इराणनं केला आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या एका व्यापारी जहाजावर झालेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून काल अमेरिकेनं इराणवर हल्ले केले, त्यानंतर इराणनं हा हल्ला केला होता.

दरम्यान संयुक्त अरब अमिरातीनं बहारीनवरच्या हल्ल्याचा निषेध केला आहे. हा हल्ला बहारीनच्या सार्वभौमत्वावरचा हल्ला असून, यामुळे सुरक्षा आणि स्थैर्याला धोका निर्मा झाल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

जागतिक बँकेनं बांगलादेशसाठी ११० कोटी डॉलर्सच्या आपत्कालीन वित्तपुरवठ्यास मान्यता दिली आहे. बागंलादेशमध्ये सध्या इंधन आणि खत दरवाढीमुळे आर्थिक अस्थिरता आणि अन्नसुरक्षेविषयी वाढती चिंता आहे. या पॅकेजमध्ये खतांची आयात आणि तांदळाच्या उत्पन्नाला पाठबळ देण्यासाठी ३० कोटी डॉलर्सचा समावेश तर रोख सहाय्य, जीवनावश्यक

वस्तू, आवश्यक वीजपुरवठा आणि आपत्कालीन खर्चासाठी ७१ कोटी ३० लाख डॉलर्स राखून ठेवण्यात आले आहेत.

<><><><><>

फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत आज अमेरिकेत पनामा आणि इंग्लंड यांच्यात सामना होणार आहे. त्याशिवाय क्रोएशिया आणि घाना यांच्यातही सामना होईल. इराणविरुद्धचा सामना १-१ बरोबरीत सोडवल्यानं इजिप्तनं या स्पर्धेच्या बाद फेरीत पहिल्यांदाच प्रवेश केला आहे. बेल्जियमनंही न्यूझीलंडला नमवून त्यांच्या गटात आघाडी मिळवली आहे.

<><><><><>

अमेरिकन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या देविका सिहाग, किदांबी श्रीकांत आणि रौनक चौहाननं उपान्त्य फेरीत धडक मारली आहे.

<><><><><>

संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेचं सामर्थ्य एमएसएमई अर्थात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाच्या योगदानावर अवलंबून आहे, असं मत उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी व्यक्त केलं. एमएसएमई दिनानिमित्त नवी दिल्लीत आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. एमएसएमई क्षेत्र देशातल्या नवउद्योजकांच्या पहिल्या पिढीच्या धाडसाचं प्रतिनिधित्व करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

//<><><><><>//